# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र | जिल्हा District: मुंबई | पोलीस ठाणे Police Station: लाप्राव्रे | पहिली खबर क्र. FIR No.: 28 | वर्ष Year: 2026 | दिनांक Date: 30/09/2026

2. (i) अधिनियम Act: म.प्र. अधि. 1988 ....... कलमे Sections: 7

(ii) अधिनियम Act ....................... कलमे Sections .......................

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections .......................

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: मंगळवार | तारीख पासून Date from: 18/06/26 | वेळ Time: 11:30 | तारीख पर्यंत Date to: 29/09/26 | वेळ Time: 19:35

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००

(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. | तारीख Date: 29/09/2026 | वेळ Time: 13:00 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 05/2026 | तारीख Date: 30/09/2026 | वेळ Time: 07:30 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information ....... लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ....... चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. .......

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: फोर्ट आयकर भवन, मुंबई | ठिकाणाचे नंबर No. if any ....... | गल्ली Ward ....... | रस्त्याचे नाव Name of road .......

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ....... | गाव Village ....... | पोस्ट Post ....... | तालुका Taluka ....... | जिल्हा Dist. ....... | राज्य State .......

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ....... | तालुका Taluka ....... | जिल्हा Dist. ....... | राज्य State .......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: संदीप गायकवाड | (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: रुस्तराव गायकवाड

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 51 वर्षे | (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय | फोन नं. Phone No. .......

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ....... | दिल्याचा दिनांक Date of issue ....... | दिल्याचे ठिकाण Place of Issue ....... | (f) व्यवसाय Occupation .......

(g) धर्म Religion: हिंदू | जात Caste ....... | जनजात Sub-Caste .......

(h) पत्ता Address: लाप्रवि कुर्ला विभाग | गल्ली/सर्व्हे नं. Ward ....... | घर/नाव नं. House Name No. ....... | फोन/मो. नं. Phone No.: 8355810250 | पॅन नं. Pan No. ....... | वोटर्स नं. Card No. .......

रस्त्याचे नाव Road ....... | जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ....... | गाव Village ....... | पोस्ट Post ....... | पो. स्टे. P. Stn. .......

तालुका Taluka: मुंबई | जिल्हा Dist.: मुंबई | राज्य State: महाराष्ट्र | सध्याचा पत्ता Present Address .......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

① अमोल दादासो मुळीक, वय 39 वर्षे, फोर्ट चांदर किरोट, रुस्तम सिधवा मार्ग, फोर्ट मुंबई.
② अरुण धोंडू दवळे, वय 55 वर्षे, मालवाडा, चांदर स्टेशन, मुंबई आयकर भवन, मंडी बाजार, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी यांची फिर्याद ही स्वतंत्र कागदावर टंकलेखीत केली असुन तीलाच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधन्यात येत आहे.

समक्ष

[signature]

(हरिदास किल्लेदार)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

[signature]

(संदीप गायकवाड)
सहाय्यक पोलीस आयुक्त
ला.प्र.वि.मुंबई घटक

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक २९/०९/२०२६

मी, संदिप सुबराव गायकवाड, वय ५१ वर्षे, व्यवसाय: नोकरी (सहाय्यक पोलीस आयुक्त), नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मोबाईल नंबर ८३५५८१०३५०

मी वरील प्रमाणे असून, सप्टेंबर २०२४ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई घटक येथे हजर झालो असून सध्या सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावर कर्तव्यावर कार्यरत आहे. पोलीस निरीक्षक श्रीमती सुनिता दिघे यांनी दि. ३१/०८/२०२६ रोजीपासून रूग्णनिवेदन केल्याने दि. ०२/०९/२०२६ रोजीपासून त्यांच्या पदाचा अतिरीक्त कार्यभार पुढील आदेशापर्यंत माझेकडे देण्यात आलेबाबत मा. अपोआ, लाप्रवि, मुंबई यांचा कार्यालयीन आदेश झाल्याने पोनि सुनिता दिघे यांचेकडील कागदोपत्री प्रकरणे आमचेकडे देण्यात आलेली आहेत. त्यापैकी पोनि दिघे यांचेकडील पडताळणी कारवाई क्र ४४/२०२६ हा देखील पुढील कारवाईकामी आमचेकडे देण्यात आला होता.

दि. २२/०९/२०२६ रोजी नमुद पडताळणीमधील तक्रारदार दवे श्री. लक्ष्मीकांत गौरीशंकर दवे, ७३ वर्षे, धंदा- व्यवसाय, रा.ठि. फ्लॅट नं. ०१ व ०२, १८ वा माळा, १५४/१५६/१५८ काळबादेवी रोड, पोपडवाडीचा नाका, अजमेरा मिंट टाऊन, मुंबई ४००००२ असे माझे समक्ष हजर झाले व त्यानी सांगितले की, त्यांचे १) हॉटेल श्रीमॉल भवन, २०/३० शामलदास गांधी मार्ग, दवा बाजार, जुनी हनुमानगल्ली का नाका मुंबई २) हॉटेल श्रीमॉल भवन, ४१३ बी वसंत वाडी, कालबादेवी रोड, मुंबई ३) हॉटेल एल.पी. २५ बी ज्ञान बिल्डीग रामवाडी कालबादेवी रोड, मुंबई अशा तीन ठिकाणी वडिलोपार्जित हॉटेलचा व्यवसाय आहे. हॉटेल श्रीमॉल भवन दवा बाजार व काळबादेवी अशा दोन आरोग्य विभागाचा परवाना तक्रारदार दवे यांचे नावावर आहे. हॉटेल एल.पी. २५ चा आरोग्य विभागाचा परवाना त्यांची पत्नी लिलादेवी दवे हिचे नावावर आहे. सदर हॉटेलपैकी श्रीमॉल भवन, २०/३० शामलदास गांधी मार्ग, दवा बाजार, जुनी हनुमानगल्ली नाका मुंबई या हॉटेलच्या परवान्याची वैधता संपत असल्याचे तक्रारदार दवे यांचे हॉटेलचे मॅनेजर सुनिल यांनी तक्रारदार दवे यांना सांगितले. तक्रारदार दवे हे दि. १५/१२/२०२५ रोजी हॉटेलचा परवाना नुतनीकरण करीता आरोग्य विभागात गेले असता सदर विभागातून तक्रारदार दवे यांचेकडे फायरब्रिगेडची एन. ओ.सी. ची मागणी केली. म्हणून तक्रारदार दवे हे दि. १५/१२/२०२५ रोजी मेमनवाडा, भेंडी बाजार येथील फायरब्रिगेडच्या कार्यालयात गेले. सदर ठिकाणाहून फायरब्रिगेड अनुपालन प्रमाणपत्राची (Compliance Certificate) पुर्तता करणेकरीता आवश्यक कागदपत्रांची यादी तक्रारदार दवे यांना प्राप्त झाली. तक्रारदार दवे यांच्या श्रीमॉल भवन, २०/३० शामलदास गांधी मार्ग, दवा बाजार, जुनी हनुमानगल्ली नाका मुंबई या हॉटेलच्या परवान्याची वैधता संपण्याकरीता कमी वेळ असल्याने व सदर वेळेत फायरब्रिगेड येथून प्राप्त यादीतील कागदपत्रांची पुर्तता करणे शक्य नसल्याने तक्रारदार दवे यांनी दि. २३/१२/२०२५ रोजी आरोग्य विभागाचे परवाना नुतनीकरण करून घेतले. त्यांनतर तक्रारदार दवे हे फायरब्रिगेड अनुपालन प्रमाणपत्राकरीता (Compliance Certificate) दि. १५/०३/२०२६ रोजी तक्रारदार दवे यांचे मॅनेजर श्री. सुनिल हे फायरब्रिगेड अधिकारी अरूण देवाळे यांना जावून भेटले असता त्यांनी सुनिल यांचेकडे फायरब्रिगेड अनुपालन प्रमाणपत्राकरीता रू. २,००,०००/- रकमेच्या लाचेची मागणी केली. सदर बाबीची खात्री करणेकरीता तक्रारदार दवे हे स्वत: जावून लोकसेवक देवाळे यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार दवे यांना आरोग्य विभागाकडून टोकन घेवून येण्यास सांगितले.

दि. १५/०६/२०२६ रोजी लोकसेवक देवाळे व आरोग्य विभागाचे अधिकारी हे तक्रारदार यांना भेटणेकरीता हॉटेल श्रीमॉल भवन, ४१३ बी वसंत वाडी, कालबादेवी रोड, मुंबई या ठिकाणी येवून तक्रारदार दवे यांची भेट घेवून हॉटेलची कागदपत्रे तपासली. सर्व कागदपत्रे तपासणी केल्यांनतर फायरब्रिगेडचे अधिकारी लोकसेवक देवाळे यांनी तक्रारदार दवे यांना हॉटेल सिल करण्याची भिती दाखवून हॉटेल श्रीमॉल भवन, २०/३० शामलदास गांधी मार्ग, दवा बाजार, जुनी हनुमानगल्लीनाका मुंबई व हॉटेल श्रीमॉल भवन, ४१३ बी वसंत वाडी, कालबादेवी रोड, मुंबई या दोन हॉटेलच्या फायरब्रिगेड अनुपालन प्रमाणपत्राकरीता प्रत्येकी रू. २,००,०००/- असे एकूण रू. ४,००,०००/- रकमेच्या लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार दवे यांना लोकसेवक देवाळे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. १८/०६/२०२६ रोजी समक्ष लाप्रवि, मुंबई येथे येवून लोकसेवकाविरूध्द लाचेच्या मागणीची तक्रार केली. त्यावेळी तक्रारदार दवे यांचे तक्रारीवर कारवाई करण्याकरीता पडताळणी क्र. ४४/२०२६ अन्वये सापळा अधिकारी पोनि सुनिता दिघे व पर्यवेक्षण अधिकारी सपोआ मनोज सुतार यांनी नेमणूक करण्यात आली.

दिनांक १९/०६/२०२६ रोजी तक्रारदार दवे यांचे तक्रारी बाबत पडताळणी करणेकरीता लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पो.नि. दिघे व स.पो.आ. सुतार यांची नेमणूक करण्यात आली व दोन शासकीय

Scanned with OKEN Scanner

पंचासमक्ष तक्रारदार दवे यांचे तक्रारीची पडताळणी केली असता, फायरब्रिगेड अधिकारी लोकसेवक देवाळे यांनी तक्रारदार दवे यांना '**सुनिल से बात हुई आपकी,**' असे विचारले असता, तक्रारदार दवे यांनी सुनिल त्याच्या बायकोला घेऊन हॉस्पिटल मध्ये गेला असल्याचे सांगितले. यावर लोकसेवक देवाळे यांनी '**तो बाकी उन्होंने बात की आपसे?', 'बात हुई ना सब आपकी' 'आप ॲग्री है?'** असे विचारले असता तक्रारदार दवे यांनी '**कुछ जादा है सर' 'सुनिलने मुझे दो लाख रूपये बोला है, इतना नही सर, थोडा बहुत कम करो यार'** असे सांगितले असता लोकसेवक देवाळे यांनी त्यांच्या समोरील कॅल्क्युलेटरवर **१.५** असा आकडा दाखविला असता, तक्रारदार दवे हे दिड लाख असे बोलले असता त्यांनी मान हलवली. सदर पडताळणीदरम्यान लोकसेवक देवाळे व तक्रारदार दवे यांचेमधील संभाषण एस.डी कार्ड क्र. **5234DTET517R** मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आलेले आहे. अशा प्रकारे लोकसेवक देवाळे यांनी तक्रारदार दवे यांचेकडे फायरब्रिगेड अनुपालन प्रमाणपत्राकरीता रूपये १,५०,०००/- रकमेच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती रूपये १,००,०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारण्याबाबत मान्य केल्याचे निष्पन्न झाले. परंतू लोकसेवक देवाळे यांनी लाच स्विकारण्याबाबतची वेळ व दिनांक सांगितली नसल्याने लोकसेवक देवाळे लाचेची रक्कम मागणी करतील त्यांनतर पुढील कारवाई करण्यात येईल असे सांगून दि. १९/०६/२०२६ रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली. सदरबाबत पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

दि. २४/०६/२०२६ रोजी तक्रारदार दवे यांचा मॅनेजर सुनिल यास लोकसेवक फायरब्रिगेड अधिकारी देवाळे यांनी फोन करून त्यांचे कार्यालयात बोलाविले. त्याप्रमाणे मॅनेजर सुनिल याने लोकसेवक देवाळे यांची भेट घेतली असता त्यांनी सुनिल यास फायरब्रिगेड अनुपालन प्रमाणपत्राकरीता लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांची यादी देवून एनओसी करीता रू. १,५०,०००/- रक्कम दयावी लागेल असे सांगितले. त्यानुसार दि. ०१/०७/२०२६ रोजी सुनिल याने तक्रारदार दवे यांना सांगितले की, दि. ०२/०७/२०२६ रोजी लोकसेवक देवाळे हे हॉटेलला भेट देणार आहेत. त्यामुळे दि. ०२/०७/२०२६ रोजी तक्रारदार दवे यांनी समक्ष येवून सांगितलेल्या हकिगतीमुळे पोनि सुनिता दिघे व सपोआ सुतार यांना सापळा कारवाईचे आयोजन केले. परंतू लोकसेवक देवाळे यांनी 'आता नाही नंतर बघू' असे म्हणून टाळाटाळ केल्याने त्यांचेमधील संभाषण एस.डी कार्ड क्र. **5234DTET517R** मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आलेले आहे. त्यावेळी लोकसेवक देवाळे व तक्रारदार यांचे संभाषणावरून तक्रारदार यांचे प्रलंबित कामाकरीता आठ दिवसांचा कालावधी लागणार असल्याचे निष्पन्न झाल्याने कारवाई स्थगित करण्यात आली. सदरबाबत सापळापुर्व पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर तक्रारदार दवे हे त्यांचे वैयक्तिक कामकरीता त्यांचे राहते गाव राजस्थान या ठिकाणी गेले. दिनांक १३/०९/२०२६ रोजी तक्रारदार दवे हे त्यांचे राहते गावावरून परत आले असता त्यांचा मॅनेजर सुनिल याने तक्रारदार दवे यांना सांगितले की, लोकसेवक देवाळे याने त्याचेकडे फायरब्रिगेड स्कुटनीकरीता रूपये ६०,०००/- मागितले होते. म्हणून मॅनेजर सुनिल याने दिनांक ०७/०९/२०२६ रोजी तक्रारदार दवे यांच्या हॉटेलच्या गल्ल्यामधून रोख रू. ६०,०००/- घेवून लोकसेवक देवळे यांना दिल्याचे सांगितले. सदर रक्कम स्विकारल्यानंतर लोकसेवक देवाळे यांनी मॅनेजर सुनिल यास फायरब्रिगेड स्कुटीनी टोकन दिले. सदर टोकन रू. ८०७०/- इतकी रक्कम बि.एम.सी. च्या ऑनलाईल साईटवरून भरणा करण्यात आल्याचे मॅनेजर सुनिल यास समजले. परंतु, उर्वरित रक्कमेबाबत त्यास न समजल्याने त्याने तक्रारदार दवे हे गावावरून आल्यानंतर तात्काळ त्यांनी सांगितले. परंतु सुनिल यास रूपये ६०,०००/- हि रक्कम लोकसेवक देवाळे यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेपैकी असल्याबाबतची कल्पना नसल्याने तक्रारदार दवे हे मॅनेजर सुनिल यास काहीही बोलले नाहीत.

त्यांनतर दिनांक २०/०९/२०२६ रोजी लोकसेवक देवाळे यांनी मॅनेजर सुनिल यास फोन करून तक्रारदार दवे यांच्या हॉटेलचे फायरब्रिगेड अनुपालन प्रमाणपत्र तयार असल्याचे सांगून ते घेवून जाण्याकरीता उर्वरीत रू. ८०,०००/- घेवून येण्यास सांगितले. परंतू तक्रारदार दवे यांची लोकसेवक देवाळे यांना उर्वरीत रू. ८०,०००/- लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने तक्रारदार दवे हे दि. २२/०९/२०२६ रोजी लाप्रवि, मुंबई कार्यालयास माझेसमक्ष हजर झाले. त्यावेळी तक्रारदार दवे यांनी मला व सपोआ सुतार यांना घडलेल्या घटनेबाबत सांगितले. त्यानुसार मी नमूद प्रकरणातील पंच १) श्री. विजय नरेंद्र वैद्य, पद- कनिष्ठ लिपिक, म्हाडा कार्यालय, बांद्रा, मुंबई व पंच २) श्री. प्रविण विनायकराव मुंदे, पद- पर्यवेक्षक, प्रधान - मुद्रांक कार्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, नगर भवन, फोर्ट, मुंबई यांना संपर्क करून लाप्रवि, मुंबई यांना कार्यालयास बोलावून घेवून सदरबाबत सांगितले व दोन पंचांसमक्ष तक्रारदार दवे यांचा जबाब घेवून त्यावर तक्रारदार, पंच व मी सहया केल्या.

Scanned with OKEN Scanner

दि. २८/०९/२०२६ रोजी सपोआ सुतार यांना तक्रारदार दवे यांनी मोबाईलवर संपर्क करून सांगितले की, मॅनेजर सुनिल यास लोकसेवक देवाळे यांनी मोबाईलवर फोन करून दि. २९/०९/२०२६ रोजी उर्वरीत रू. ८००००/- घेवून तक्रारदार दवे यांना फोर्ट अग्निशमन कार्यालय येथे पाठविण्यास सांगितले आहे. त्यानुसार सपोआ सुतार यांनी नमूद कारवाईमधील दोन्ही पंच व पथकास दि. २९/०९/२०२६ रोजी कारवाई दृष्टीने हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार दि. २९/०९/२०२६ रोजी सापळा पथक व पंच असे लाप्रवि, मुंबई कार्यालयास माझे व सपोआ सुतार यांचेसमक्ष हजर झाले असता, मी तक्रारदार दवे हे परस्पर बँक ऑफ इंडीया मुख्य कार्यालय, काळबादेवी, मुंबई या ठिकाणी येणार असल्याचे सांगून तक्रारदार दवे यांचे तक्रारीची व कारवाईची पंच व पथकास उजळणी करून देवून दि. २९/०९/२०२६ रोजी पोलीस पथक, पंच असे दोन शासकीय वाहनासह सुमारे १४.१५ वा. लाप्रवि, मुंबई कार्यालयातून रवाना होवून सुमारे १५.०० वाजता बँक ऑफ इंडीया मुख्य कार्यालय, काळबादेवी, मुंबई या ठिकाणी दोन्ही वाहने पोहोचली. सदर ठिकाणी तक्रारदार दवे व त्यांचा मॅनेजर सुनिल असे हजर होते. तक्रारदार दवे यांनी आम्हास सांगितले की, लोकसेवक देवाळे यांनी मॅनेजर सुनिल यास लाचेची रक्कम रू. ८०,०००/- घेवून फोर्ट अग्निशमन केंद्र येथे बोलाविले आहे. त्यानुसार मी व सपोआ सुतार यांनी पंच व पथकास लोकसेवक देवाळे हे आज रोजी तक्रारदार दवे किवा त्याचे मॅनेजर यांचेकडून लाचेची रक्कम रू. ८०,०००/- स्विकारण्याची शक्यता असल्याचे सांगितले व त्याकरीता आवश्यक त्या खबरदारीच्या सुचना पंच, पथक व तक्रादार यांना देण्यात आल्या. त्यानंतर मी व तक्रारदार दवे यांचेकडून सापळा कारवाईकरीता आवश्यक असलेले रू. ८०,०००/- हजर करण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार दवे यांनी त्यांचे हॅटेलच्या बचतीतील रू. ८०,०००/- पंचासमक्ष माझे ताब्यात दिले. सदर रक्कमेचे वेळेअभावी माझ्या मोबाईलमध्ये फोटो काढण्यात आले. सदर रक्कम लाचेची रक्कम म्हणून वापरण्यात येणार असल्याचे मी, पंच व तक्रारदार दवे यांना सांगून त्यांना अॅन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. चालक पो.शि. २१६३२१/चौरे यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रूपये ८०,०००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या १६० नोटा) रक्कमेच्या नोटांना अॅन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम सफेद रंगाच्या लिफाफयामध्ये ठेवून सदर लिफाफा तक्रारदार दवे यांनी परिधान केलेल्या पायजम्याच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी मी व सपोआ सुतार यांनी तक्रारदार दवे, पंच व पथक यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने चालक पोशि चौरे हे सापळा कारवाईमध्ये प्रत्यक्ष भाग घेणार नसल्याचे तसेच लोकसेवक यांनी लाच स्विकारल्यानंतर तक्रारदार दवे हे त्यांचा हातरूमाल त्यांच्या तोंडावरून फिरवतील असा लाच स्विकारल्याचा इशारा करावा असे सांगतिले व सापळा कारवाई यशस्वी करणेसाठी आवश्यक त्या सूचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो तांत्रिक मदतनीस यांचे मदतीने तक्रारदार दवे यांनी परिधान केलेल्या कुर्त्याच्या आतील बाजुस बनियानला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने अडकविला. त्यांनतर तक्रारदार दवे, मॅनेजर सुनिल व पंच ०१ विजय वैद्य असे टॅक्सीने लोकसेवक देवाळे यांची भेट घेणेकरीता फोर्ट अग्निशमन केंद्र येथे गेले. त्यांचे मागोमाग आम्ही पोलीस पथक व पंच ०२ मुंदे असे टॅक्सीने फोर्ट अग्निशमन केंद्र येथे जावून परिसरात कोणासही संशय येणार नाही अशा रितीने तक्रारदार दवे याचे हालचालीवर लक्ष ठेवून दबा धरून बसलो. त्यावेळी सपोआ मनोज सुतार यांनी व मी सापळा निट लावला असल्याची खात्री करून घेतली व एकमेकांना कळेल असा इशारा करून थांबलो.

तक्रारदार दवे, मॅनेजर सुनिल व पंच ०१ वैद्य असे फोर्ट अग्निशमन केंद्र येथे गेल्यांनतर तक्रारदार दवे यांचे सांगण्यानुसार पंच ०१ हे नमूद कार्यालयाच्या बाहेर थांबले. तक्रारदार दवे व मॅनेजर सुनिल असे फोर्ट अग्निशमन केंद्रामध्ये गेले. सदर ठिकाणी जावून मॅनेजर सुनिल याने लोकसेवक देवाळे यांना त्यांच्या मोबाईलवर सपंर्क केला असता त्यांनी लाचेची रक्कम रू. ८०,०००/- त्यांचे सहकारी श्री अमोल मुळीक यांचेकडे देण्यास सांगितले. त्यानुसार मॅनेजर सुनिल यांनी लोकसेवक मुळीक यांना संपर्क केला असता त्यांनी ते कॉलवर कार्यवाहीकामी गेले असल्याचे सांगून त्यांना त्या ठिकाणीच थांबण्यास सांगितले. काही वेळाने लोकसेवक मुळीक हे फोर्ट अग्निशमन केंद्र या ठिकाणी आले व त्यांनी तक्रारदार दवे व मॅनेजर सुनिल यांना फोर्ट अग्निशमन केंद्राच्या आत घेवून गेले व त्यांचेमध्ये तक्रारदार यांचे कामाची **''हा वो पेपर कम्पलायस का''** असे बोलून चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना **''रखदो वहा पें, यहा पे रखो, कितना है क्या कुछ बोला है, एटी दू बोले थे ना, वो लेके जावो ना, जावो लेके हम ऐसा हि करेंगे, ऐसा है क्या बॉस, हम अभी पंधरा दिन आपका विदआऊट लेट ये किया, जुन महिने से आपके गलती कि वजह से वो डिले हो गया''** असे बोलून लाचेची रक्कम स्विकारली. त्यानंतर लोकसेवक मुळीक यांनी लोकसेवक देवाळे यांना फोन करून **''हेलो सर ऐशी पेपर बोलतात ते, आता ते काय बोलणार, हा ठिक आहे''** असे बोलणं केले. काही वेळाने तक्रारदार दवे यांनी बाहेर येवून पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच दबा धरून बसलेल्या

पथकाने फोर्ट अग्निशमन केंद्र तळमजला येथील रूम क्र. ०४ मधून लोकसेवक मुळीक यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले.

त्यानंतर आमचे पथकाने ताब्यात घेतलेल्या लोकसेवक अमोल दादासो मुळीक यांस स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत दोन्ही पंचासमक्ष विचारणा केली असता त्यांनी सदरची रक्कम ही त्यांच्या बाजूस असलेल्या पलंगावर असल्याचे सांगितले. सदर लाचेच्या रकमेची पंचासमक्ष पहाणी केली असता, सदर लाचेच्या नोटांची/रक्कमेची व वेळे अभावी मोबाईल फोनदवारे काढण्यात आलेल्या फोटो मधील नोटांचे क्रमांक तंतोतंत मिळून आल्याची खात्री करून घेतली. त्यांनतर मी व सपोआ सुतार यांनी आलोसे मुळीक यांना सदर रकमेबाबत विचारणा केली असता यांनी सदर रक्कम लोकसेवक अरूण देवाळे यांचे सांगण्यावरून स्विकारली असल्याचे सांगितले. त्यामुळे पंचासमक्ष आलोसे मुळीक यांचे मोबाईलवरून लोकसेवक देवाळे यांना फोन केला असता लोकसेवक देवाळे यांनी **''अरे तू ऐशी बोलास ना? ते तुझे कापुन घे तू दिलेले सुद्धा, बघू चला नंतर सांगतो किती झाले ते''** असे बोलून स्पष्ट सहमती दिली. नमूद दिवशीचे लोकसेवक देवाळे व तक्रारदार दवे यांचेमधील संभाषण एस.डी कार्ड क्र. **2426DTGPK1CT** मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आलेले आहे. त्याबरोबर तात्काळ सपोआ सुतार यांनी आलोसे मुळीक यांचेकडून लोकसेवक देवाळे यांचे लोकेशन बाबत माहिती घेवून पंच ०२ यांचेसह व निवडक पथकासह शासकीय वाहन घेवून रवाना होवून लोकसेवक देवाळे यांना नरीमन पॉइंट अग्निशमन केंद्र या ठिकाणाहून लागलीच ताब्यात घेतले. त्यांना ताब्यात घेतल्याची माहिती त्यांचे वरिष्ठांना देवून सपोआ सुतार आलोसे अरूण धोंडू देवाळे यांना ताब्यात घेवून फोर्ट अग्निशमन केद्रं या ठिकाणी हजर झाले. सदर ठिकाणी रूमच्या सर्व लाईट बंद करून अल्ट्रावॉयलेट दिव्याच्या प्रकाशात आलोसे मुळीक यांच्या दोन्ही हाताची तपासणी केली असता आलोसे मुळीक यांच्या दोन्ही हातांच्या पेरांना निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यांनतर आलोसे अमोल दादासो मुळीक व आलोसे अरूण धोंडू देवाळे यांना ताब्यात घेतल्याची माहिती त्यांचे वरिष्ठांना देवून त्यांना तब्यात घेवून लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी दि. १८/०६/२०२६ रोजी तक्रारदार श्री. लक्ष्मीकांत गौरीशंकर दवे यांनी केलेल्या लेखी तक्रारी नुसार केलेल्या पडताळणी/सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक अरूण धोंडू देवाळे, पद- केंद्र अधिकारी यांनी तक्रारदार दवे यांचे हॉटेलच्या फायरब्रिगेड अनुपालन प्रमाणपत्र (Compliance Certificate) देण्याकरीता कायदेशीर परिश्रमाखेरीज स्वत:च्या वैयक्तिक फायदयाकरीता शासकीय रकमेव्यतिरीक्त रू. २,००,०००/- रकमेच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. १,५०,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे निश्चित केले. पैकी रू. ६०,०००/- फायरब्रिगेड स्कुटनीकरीता तक्रारदार दवेच्या अनुपस्थित त्यांचे मॅनेजरकडून स्विकारून तसेच त्यापैकी अनुपालन प्रमाणपत्राची शासकीय फी रू. ८,०७०/- बिएमसीच्या ऑनलाईन साईटवर भरणा करण्यास सगितले व दि. २९/०९/२०२६ रोजी उर्वरीत रू. ८०,०००/- हे आलोसे अरूण धोंडू देवाळे यांच्या सांगण्यावरून लोकसेवक अमोल दादासो मुळीक, पद- केंद्र अधिकारी यांना स्विकारताना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले म्हणुन माझी नमूद लोकसेवक १) अमोल दादासो मुळीक, पद- केंद्र अधिकारी, फोर्ट फायर स्टेशन, मंबई अग्निशमन दल, मुंबई व लोकसेवक २) अरूण धोंडू देवाळे, पद- केंद्र अधिकारी, मेमनवाडा फायर स्टेशन, मंबई अग्निशमन दल, मुंबई यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(हरिदास किल्लेदार)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

(संदीप गायकवाड)
सहायक पोलीस आयुक्त
ला.प्र.वि. मुंबई घटक

Scanned with OKEN Scanner

विलंबाचे / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

वरील तारीख, वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार यांच्या हॉटेलचा फायर ब्रिगेड अनुपालन प्रमाणपत्र देण्याकरीता आलोसे क्र. 2 अरुण पवळे याने कायदेशीर पारिश्रमिक खेरीज स्वतःच्या वैयक्तिक फायद्याकरीता शासकीय रक्कम व्यतिरिक्त 2,00,000/- रक्कमेच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती 1,50,000/- लाचेची रक्कमेची मागणी केली त्यापैकी 60,000/- रुपये तक्रारदार यांच्या मॅनेजरकडून स्विकारले उर्वरित लाचेची रक्कम 80,000/- रु. आलोसे क्र. 2 यांचे सांगण्यावरून आलोसे क्र. 1 अमोल मुळीक याना स्विकारताना रंगेहाथ ताब्यात घेतले म्हणून माझी त्या दोघी आलोसे विरुद्ध भ्र.प्र. अधि. 1988 कलम 7 अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : सपोआ हरिदास किल्लेदार

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .......... Rank .......... No. ..........

6 to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. ..........

District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name हरिदास किल्लेदार

पदनाम Rank सहाय्यक पोलीस आयुक्त

तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई विभाग

Posting

Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........

1. Date and time of submitted to the Court.

7. प्रत 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of First Information Report

(1)

(2)

(G

Scanned with OKEN Scanner